# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २० जून २०१५

## विद्यानगरी परिसरात स्क्वॅश आणि बॅडमिंटन कोर्टचे अनावरण

## क्रिडा संकुलात अत्याधुनिक सुविधा

मुंबई- क्रीडा विषयक पायाभूत सुविधांचा विकास व क्रीडा वातावरण निर्मितीसाठी मुंबई विद्यापीठाने आणखी एक पाऊल पुढे टाकत विद्यानगरी परिसरातल्या क्रिडा संकुलामध्ये स्क्वॅश कोर्ट,बॅडमिंटन कोर्ट आणि मॅपलवूड प्लोरींगचे अनावरण मा. कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांच्या हस्ते करण्यात आले.

क्रीडा प्रशिक्षणांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि साहसी खेळाना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच खेळांसाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि मुंबईतील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर छाप पडावी यासाठी विद्यानगरी परिसरात खेळासाठी पायाभूत सुविधा तयार करण्यावर विद्यापीठ प्रशासनाने नेहमीच भर दिला आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे युएसएमधून आयात केलेले मॅपलवूड फ्लोरींग क्रिडा संकुलामध्ये बसविण्यात आले आहे.मॅपलवूड फ्लोरींगचे वैशिष्ट्ये म्हणजे हे अत्यंत टिकावू असून त्यावर विविध इनडोअर खेळांचे आयोजन केले जाऊ शकते,विशेष म्हणजे बॉल व्हिजीबीलीटीसाठी हे अत्यंत प्रसिध्द लाकूड म्हणून ओळखले जाते.ही फ्लोरींग बास्केटबॉल कोर्ट,बॅडमिंटन कोर्ट,हॅंडबॉल कोर्ट आणि व्हॉलीबॉल कोर्ट अशा एकुण १४०० स्क्वेअर मीटर क्षेत्रफळामध्ये बसविण्यात आले आहे.

तर २१*३२ स्क्वे.मीटरच्या क्षेत्रफळाचे स्क्वॅश कोर्ट तयार करण्यात आले आहे.हार्ड प्लास्टर,ग्लास फायबर रेनफोर्स्ड़ सिस्टीम अशी या स्क्वॅश कोर्टची वैशिष्ट्ये आहेत.

क्रिडा संकुलात पार पडलेल्या आजच्या या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे बीसीयुडी संचालक डॉ.राजपाल हांडे,कुलसचिव डॉ.एम.ए.खान,विविध प्राधिकरणातील सदस्य आणि प्राध्यापक वर्गासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)